महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | शुक्रवार, दि. ६ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ८८ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१९३१ : पंडीत मोतीलाल नेहरु यांचे निधन झाले.
१९३२ : दादासाहेब फाळके यांचा 'अयोध्येचा राजा' हा पहिला मराठी बोलपट मुंबईच्या मॅजेस्टिक चित्रपटगृहात प्रदर्शित झाला.
१९३९ : जनहितैषी राजे म्हणून ख्यातनाम असलेले बडोद्याचे सयाजीराव गायकवाड महाराज यांची पुण्यतिथी. ज्योतीराव फुले यांना महात्मा ही पदवी यांनीच दिली.

सेन्सेक्स ८३,३१३.९३ +५०३.७६ (०.६०%)
डॉलर ₹ ९०.३१

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३२ | १५ |
| दिल्ली | २४ | १० |
| मुंबई | ३५ | २१ |
| नागपूर | ३१ | १६ |
| पुणे | ३२ | १२ |

## सुविचार

आयुष्य हे एक सुंदर प्रवास आहे; प्रत्येक दिवसाला एक नवीन अध्याय मानून जगा.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-७:०३ संध्या-६:२१

## सोने – चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५५,६७५/- ३,००,०००/-

## केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### गुजरातचा छोकरा अमेरिकेचा कप्तान

**रांची ।** आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेचा बिगुल वाजला आहे. या स्पर्धेला ७ फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. या स्पर्धेत २० संघ जेतेपदाची ट्रॉफी जिंकण्यासाठी मैदानात उतरणार आहे. २० संघांना ४ गटात विभागण्यात आलं आहे. भारतीय संघाचा स्पर्धेतील पहिला सामना ७ फेब्रुवारीला अमेरिकेविरुद्ध होणार आहे. या स्पर्धेत अमेरिकेचं नेतृत्व युवा फलंदाज मोनांक पटेल करताना दिसून येणार आहे. तो गुजरातचा रहिवासी आहे.

### अर्थ खातं हाती घेताच मुख्यमंत्री ॲक्शन मोडमध्ये

**मुंबई ।** सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर त्यांच्याकडे अजित पवार यांच्याकडे असलेले अर्थखाते वगळता इतर खात्यांची जबाबदारी सोपविण्यात आली. यानंतर कालच त्या पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री झाल्या आहेत. आता अर्थ व नियोजन खात्याची जबाबदारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे येताच त्यांनी अनावश्यक खरेदीला आळा घातला आहे.

## साधू- महंतांचा राग निवळला...



नाशिक : सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर, त्र्यंबकेश्वर येथील आखाड्यांमध्ये सुविधांच्या कामांकडे दुर्लक्ष झाल्यावरून राज्य सरकार आणि कुंभमेळा आयुक्तांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेणाऱ्या साधू-महंतांचा राग अलीकडेच कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांच्याशी चर्चेनंतर निवळला

# अमेरिका-इराण आमनेसामने

## ओमानमध्ये आज वाटाघाटीसाठी महत्त्वाची बैठक

वृत्तसंस्थत्त । वॉशिंग्टन

**अमेरिका आणि इराणमधील प्रस्तावित चर्चेचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. चर्चा कोसळण्याच्या उंबरठ्यावर पोहोचल्या असल्या तरी, दोन्ही देश आता वाटाघाटी पुन्हा सुरू करण्यास तयार आहेत. द गार्डियन या ब्रिटिश वृत्तपत्रातील वृत्तानुसार ही महत्त्वाची बैठक आता शुक्रवारी तुर्कीये येथील पूर्वी नियोजित ठिकाणाऐवजी ओमानची राजधानी मस्कत येथे होणार आहे.**

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी बुधवारी उशिरा घोषणा केली की ही बैठक आता मस्कतमध्ये होईल. त्यांनी सोशल मीडियावर लिहिले की, अमेरिकेसोबत अणु चर्चा शुक्रवारी सकाळी १० वाजता मस्कतमध्ये होईल. बैठकीचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी



ओमानचे आभारही मानले.

अमेरिकन अधिकाऱ्यांनीही चर्चा होणार असल्याची पुष्टी केली. ही बैठक प्रदेशात तणावाच्या काळात होत आहे. अमेरिकेने तेथे आपली लष्करी उपस्थिती वाढवली आहे आणि जर चर्चा अयशस्वी झाली तर इराणला संभाव्य कारवाईचा इशारा दिला आहे.बुधवारच्या सुरुवातीला असे दिसून आले की चर्चा तुटतील. इराणने स्पष्टपणे सांगितले आहे की ते त्यांच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांवर किंवा इतर प्रादेशिक मुद्द्यांवर (पान २ वर)

### ➤ या मुद्द्यांचा समावेश केला तरच चर्चा पुढे सरकेल

अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो म्हणाले की अमेरिका चर्चेसाठी तयार आहे, परंतु त्यांच्या स्पष्ट मागण्या आहेत. ते म्हणाले, जर चर्चेतून कोणतेही ठोस निकाल हवे असतील तर त्यात काही आवश्यक मुद्दे समाविष्ट असले पाहिजेत. त्यांनी इराणची क्षेपणास्त्रे, सशस्त्र गटांना पाठिंबा, अणुकार्यक्रम आणि त्यांच्या स्वतःच्या लोकांवर होणारी वागणूक यांचा उल्लेख केला.जेव्हा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना इराणच्या भूमिकेबद्दल विचारण्यात आले तेव्हा त्यांनी सांगितले की इराणच्या सर्वोच्च नेत्याने काळजी घेतली पाहिजे. मी म्हणेन की त्यांना खूप काळजी करावी, ट्रम्प म्हणाले.

## जळगावहून इंदूरसाठी एप्रिलपासून विमान सेवा सुरु होणार

प्रतिनिधी । जळगाव

**आगामी एप्रिल महिन्यापासून जळगावहून थेट इंदूरसाठी विमान सेवा सुरू होण्याचे संकेत आहेत. 'फ्लाय ९१' कंपनीने त्यांच्या संकेतस्थळावर जळगाव-इंदूर विमानसेवा लवकरच सुरु**




होत असल्याचे जाहीर केले आहे. कंपनीकडे सध्या सहा एअरक्रॉफ्ट आहेत. कंपनीतर्फे आणखी तीन (पान २ वर)

### ➤ व्यावसायिक विमानसेवा

जळगावातून गोवा, पुणे, अहमदाबाद, मुंबई, हैदराबाद या पाच शहरात आरसीएसअंतर्गत (रिजनल कनेक्टीव्ही सर्व्हीस ) विमानसेवा सुरु आहे. नव्याने सुरु होणारी जळगाव-इंदूरसेवा मात्र व्यावसायिक तत्वावर असण्याची शक्यता आहे.

# मंत्री नसतो तर खुंटा उपटून मारेन!

## खराब रस्त्यावरून मंत्री गुलाबराव पाटील संतप्त

वृत्तसंस्था । लातूर

**लातूर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारासाठी शिवसेना (शिंदे गट) नेते व राज्याचे पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील हे लातूर जिल्ह्यात आले असता, कामखेड ते रेनापूर रस्त्याच्या दुरवस्थेवरून त्यांनी तीव्र संताप व्यक्त केला. उद्या मी मंत्री नसलो आणि माझ्याकडे असा रस्ता असेल, तर मी खुंटा उपटून मारेन, अशा शब्दांत त्यांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींना खडेबोल सुनावले.**



ना.पाटील म्हणाले की, सोन्याचे चमचे घेऊन जन्माला आलेल्यांना या निवडणुकीतून फक्त पैसे कमवायचे असतात. म्हणून ते कोणाकडूनही तिकीट घेतात. पैसा वाटतात आणि निवडून येतात, असा आरोप त्यांनी केला. लातूरमधील भाजप आणि काँग्रेसचे उमेदवार हे दोघेही दांडगे आहेत. त्यांना फक्त पैसा कमवायचा आणि वाटायचा आहे. त्यामुळे हे दोघे एकमेकांना आय लव्ह यू म्हणतात, असा टोला त्यांनी लगावला. तसेच काँग्रेसवाल्यांचा सत्यानाश होऊ द्या,असे विधान करत त्यांनी राजकीय टोलेबाजी केली.

रस्त्याच्या दुरवस्थेबाबत बोलताना ना.पाटील यांनी गावकऱ्यांना थेट सल्ला देत, या रस्त्याने या भागाच्या आमदाराला पुन्हा गावात येऊ देऊ नका. आधी रस्ता दुरुस्त करा, मगच गावात या, असा सल्ला त्यांनी दिला. या रस्त्याने प्रवास करताना प्रत्येक नागरिक त्रस्त आहे. मी उद्या मंत्री राहिलो नाही आणि (पान २ वर)

## ● ओला-उबरला आता करा 'टाटा-टाटा-बाय-बाय'!

# पहिली सरकारी कॅब सेवा 'भारत टॅक्सी' आजपासून सुरु




वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**देशातील पहिली सहकारी टॅक्सी सेवा, 'भारत टॅक्सी' ॲप, आज सरकारकडून लाँच केली जाणार आहे. चालक-मालकी मॉडेलवर आधारित, भारत टॅक्सी ॲप राईड्समधून कोणतेही कमिशन कापणार नाही आणि संपूर्ण उत्पन्न ड्रायव्हरला जाणार आहे.**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा विज्ञान भवन याठिकाणी आयोजित समारंभात ते लाँच करणार आहेत. सुरुवातीला, ते दिल्ली-एनसीआरमध्ये लाँच केले जात आहे. मुंबई, बेंगळुरू आणि चेन्नई सारख्या प्रमुख शहरांमध्ये टप्प्याटप्प्याने ते सुरू केले जाईल.

ही सहकारी सेवा ओला, उबर आणि रॅपिडोशी स्पर्धा करेल, ज्यांचे भाडे खाजगी कंपन्यांपेक्षा स्वस्त असेल. ६ जून २०२५ रोजी त्याची स्थापना झाल्यापासून, ३ लाखाहून अधिक ड्रायव्हर्स प्लॅटफॉर्ममध्ये सामील झाले आहेत आणि १ लाखाहून अधिक वापरकर्ते आधीच नोंदणीकृत आहेत. भारत टॅक्सीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे ड्रायव्हर-मालकी मॉडेल.

पारंपरिक ॲग्रीगेटर मॉडेल्सच्या विपरीत, ड्रायव्हर्सना त्यांच्या कमाईचा एक महत्त्वाचा भाग कंपनीला कमिशन म्हणून द्यावा लागतो.'भारत टॅक्सी' ड्रायव्हर्सना कोणतेही कमिशन आकारणार नाही. या सहकारी संस्थेत चालकांना पाच शेअर्ससह हिस्सा दिला जाईल. ज्यामुळे ते प्लॅटफॉर्मचे मालक (पान २ वर)

# जि.प.- पंचायत समिती निवडणुकांसाठी उद्या मतदान

## ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता मतमोजणीस सुरुवात

वृत्तसंस्था । मुंबई

**राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी ७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. त्यानुसार जाहीर प्रचाराची समाप्ती आज ५ फेब्रुवारी रोजी रात्री १० वाजता करण्यात आली.**

मतदानाच्या ४८ तास आधी जाहीर प्रचार थांबविण्याचे निर्देश राज्य निवडणूक आयोगाने यापूर्वीच



दिले होते. तर ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरू करण्यात येणार आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता तात्काळ संपुष्टात येईल. नियमानुसार रात्री १० वाजल्यानंतर कोणत्याही प्रकारच्या जाहीर सभा ,प्रचार करता येणार नाही. मात्र, जाहीर प्रचार संपल्यानंतर उमेदवारांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना घरोघरी जाऊन वैयक्तिक संपर्क साधून प्रचार करण्यास परवानगी असल्याचे राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम २८ ब (१) नुसार मतदानास सुरुवात होण्याच्या आधीच्या २४ तासांत तसेच मतदानाच्या दिवशी कोणतीही सार्वजनिक सभा, प्रचार फेरी किंवा जाहीर प्रचार करता येणार नाही. दरम्यान, (पान २ वर)

## सर्वोच्च न्यायालयाने डेटा शेअरिंगवरून व्हॉट्सॲपला फटकारले...!

वृत्तसंस्था । मुंबई

व्हॉट्सॲप आणि त्याची मूळ कंपनी मेटा प्लॅटफॉर्म्सच्या डेटा शेअरिंग धोरणावरून सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी अत्यंत कठोर भूमिका घेतली.

तुम्ही देशातील घटनात्मक मूल्यांची थट्टा करीत असून नागरिकांच्या वैयक्तिक डेटाचा गैरवापर आणि गोपनीयतेशी होणारी छेडछाड कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही, अशी तंबीच न्यायालयाने दिली. डेटा शेअरिंग आणि गोपनीयतेशी उपस्थित झालेल्या चिंतेचे निराकरण करता येत नसल्यास आताच देशातून निघून जावे, असा थेट इशाराही न्यायालयाने दिला. मेटाचा भाग असल्यामुळे व्हॉट्सॲप आपल्या वापरकर्त्यांचा डेटा आणि त्यांची माहिती मेटाच्या मालकीच्या इतर कंपन्या जसे की फेसबुक व इन्स्टाग्राम इत्यादींबरोबर शेअर करू शकते.



# चोपडा मतदारसंघातील विविध विकासकामांचे आज भूमिपूजन

## आ.प्रा.चंद्रकांत सोनवणे यांच्या प्रयत्नांनी मंजूर झालेली विविध विकास कामे

प्रतिनिधी । चोपडा

**आ.प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या प्रयत्नांनी चोपडा विधानसभा मतदारसंघात मंजूर झालेल्या विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा दि. ६ फेब्रुवारी व ७ फेब्रुवारी रोजी दोन दिवस आयोजित करण्यात आला आहे.**

या कामांचे भूमिपूजन आ.प्रा. चंद्रकांत सोनवणे यांच्या शुभहस्ते होत आहे. यावेळी

प्रमुख पाहुणे होऊन माजी आ. सौ. लताताई चंद्रकांत सोनवणे ह्या उपस्थित राहणार आहेत. ६ रोजी भूमिपूजन होणारे विकास कामे व मंजूर रक्कम पुढीलप्रमाणे जामण्या (ता.यावल)येथे पाझर तलाव दुरुस्त करणे, १ कोटी रुपये, कासारखेडा (ता.यावल) येथे स्मशानभूमी सांत्वन शेड बांधणे. ५ लक्ष रु., आडगाव (ता.यावल) येथे स्मशानभूमी सांत्वन शेड बांधणे.१० लक्ष रु., चिंचोली (ता.यावल) येथे स्मशानभूमी बांधकाम करणे.१० लक्ष रु., उंटावद (ता.यावल) येथे स्मशानभूमी सांत्वन शेड बांधणे १० लक्ष रु कोळन्हावी प्र.अ.(ता. यावल) येथे रस्ता काँक्रिटीकरण करणे.१० लक्ष रु., डांभूर्णी (ता. यावल) येथे स्मशानभूमीपर्यंतचा रस्ता करणे, १० लक्ष रु., चिंचोली (ता.यावल) येथे बौध्दविहार लोकार्पण करणे २० लक्ष रु..

### ➤ या कामांचे उद्या भूमिपूजन

दि. ७ फेब्रुवारी रोजी होणारे भूमिपूजन कामे व मंजूर रक्कम पुढीलप्रमाणे सुटकार येथे दलित वस्तीत पेव्हर ब्लॉक बसविणे, ५ लक्ष रु.,वटार येथे स्मशानभूमी बांधकाम करणे, १० लक्ष रु., उनपदेव येथे १ वर्ग खोली बांधकाम करणे, १० लक्ष रु., अडावद येथे कन्या शाळा वर्ग खोली बांधकाम करणे, १२.५० लक्ष रु. कमळगाव येथे सामाजिक सभागृह बांधकाम करणे, २० लक्ष रु.देवगाव येथे स्मशानभूमी बांधकाम करणे, १० लक्ष रु. अडावद येथे माळी सामाजिक सभागृह लोकार्पण करणे. ४० लक्ष रु., अडावद येथे राणे राजपूत सामाजिक सभागृह लोकार्पण करणे, ३० लक्ष रु. अडावद येथे भोई समाज मंदिर सामाजिक सभागृह लोकार्पण करणे.

## सीएसएमटी स्थानकात आई – दोन मुलांची ताटातूट

वृत्तसंस्था । मुंबई

ठाण्यातील डोंगरी पाडा येथील रहिवासी असलेली एक महिला आपल्या दोन मुलांसह बुधवारी सायंकाळी निघाली. तिने ठाण्याहून लोकलने सीएसएमटी स्थानक गाठले. रात्री ८ च्या सुमारास फलाट क्रमांक ४ वर प्रवाशांच्या गर्दीत मुले आणि आईची चुकामुक झाली. मुले दिसेनाशी झाल्याने आई प्रचंड घाबरली. त्यावेळी त्यांना फलाटावर प्रवासी निधी कामत भेटल्या. त्यांनी तातडीने परिस्थितीचे गांभीर्य ओळखून रेल्वे चाईल्ड हेल्प डेस्कशी मदत क्रमांक १०९८ वरून संपर्क साधला. त्यानंतर तातडीने रेल्वे चाईल्ड हेल्प डेस्कचे पथक फलाटावर दाखल झाले. त्यांनी तातडीने सूत्रे हलवली.

# राज्यभरातील परिचारिका संतप्त 'सीएमई'च्या नावाखाली आर्थिक लूट

वृत्तसंस्था । नागपूर

**महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या नियमानुसार परिचारिकांची नोंदणी (लायसन्स) नूतनीकरणासाठी पाच वर्षांत १५० क्रेडिट पॉईंट अनिवार्य आहे. ते पूर्ण करण्याच्या व्यवस्थेतील त्रुटी, रुग्णालयांत मनुष्यबळाची कमतरता आणि सीएमईच्या नावाखाली सुरू असलेली आर्थिक लूट यामुळे परिचारिका संतापल्या आहेत. या मुद्द्यावर काही घटनांनीही आक्रमक भूमिका घेतली आहे.**

महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या नियमानुसार प्रत्येक पाच वर्षांत परिचारिकांना नोंदणी नूतनीकरण करणे बंधनकारक आहे. त्यासाठी ऑनलाईन अथवा ऑफलाईन पद्धतीने ज्ञानवर्धन करणाऱ्या सीएमई, कार्यशाळांमधून १५० क्रेडिट पॉईंट मिळवणे आवश्यक आहे. २०२७ मध्ये नोंदणी नूतनीकरणाची मुदत संपत असताना, आजही मोठ्या संख्येने परिचारिकांचे क्रेडिट पॉईंट अपूर्ण आहेत.परिचारिकांनी ऑनलाईन सीएमई पूर्ण करूनही अनेकदा क्रेडिट पॉईंट प्रणालीत दिसत नाहीत. काही ऑनलाईन सीएमईमध्ये उपस्थितीची मर्यादा असल्याने अडचण निर्माण होते. वैद्यकीय शिक्षण खाते आणि सार्वजनिक (पान २ वर)

## संपादकीय

### भार अन् अधिभार

अर्थसंकल्पाच्या गदारोळात एका महत्त्वाच्या विषयाचा आढावा घेता आला नाही. तो विषय म्हणजे वित्त आयोगाचा सादर झालेला अहवाल. अर्थतज्ज्ञ अरविंद पनगडिया हे त्याचे प्रमुख. या आयोगाचे प्रमुखपद अलीकडे भूषवणारी मराठी व्यक्ती म्हणजे ज्येष्ठ अर्थवेत्ते डॉ.विजय केळकर. त्याआधी माजी अर्थमंत्री, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण हे आठव्या वित्त आयोगाचे प्रमुख होते. त्यानंतर पुढच्याच वर्षी एनकेपी साळवे यांच्याकडे या आयोगाचे प्रमुखपद दिले गेले आणि त्यानंतर चार वर्षांनी, २००७ साली, डॉ केळकर यांची त्या पदी नेमणूक झाली. केंद्र सरकारकडे जमा होणाऱ्या महसुलाचे वाटप राज्याराज्यांमध्ये कसे करावे, त्याचे निकष काय, कोणते समीकरण त्यासाठी तयार करावे आणि मुख्य म्हणजे केंद्राच्या तिजोरीत जमा होणाऱ्या उत्पन्नाचा किती वाटा राज्यांत वाटून द्यावा हे ठरवणे ही या वित्त आयोगाची जबाबदारी. देशात घटनेचा अंमल सुरू झाल्यानंतर, म्हणजे २६ जानेवारी १९५० नंतर, अशा वित्त आयोगाची स्थापना होऊ लागली. हा वित्त आयोग १६वा. त्याच्या शिफारशी अर्थमंत्र्यांस सादर केल्या गेल्या आणि त्याबाबतची घोषणाही निर्मला सीतारामन यांनी केली. देशाची संघराज्य व्यवस्था अधिकाधिक सक्षम होण्यासाठी केंद्र आणि राज्यांत हे निधीवाटप कळीचे असते. त्यामुळे या आयोगाच्या शिफारशींवर भाष्य आवश्यक.राज्याचे सीमावर्ती असणे, डोंगराळ प्रदेशांचा अंतर्भाव, प्रगतीच्या संधींची वानवा, लोकसंख्या, नैसर्गिक आव्हाने इत्यादींचा विचार हे निधी वाटपाचे सूत्र ठरवताना केला जातो. त्यानुसार कोणत्या राज्यास किती रक्कम द्यावयाची हे निश्चित केले जाते. गेल्या वित्त आयोगाने लोकसंख्या हा निकष महत्त्वाचा मानला आणि त्यास एकूण निधी वाटपात १५ टक्के इतका वाटा दिला. लोकसंख्या नियंत्रण प्रयत्नातील यशासाठी १२.५ टक्के निधी मिळत गेला आणि दरडोई सकल राज्य उत्पादनासाठीचा (पर कॅपिटा ग्रॉस स्टेट डोमेस्टिक प्रॉडक्ट) वाटा २५ टक्क्यांवर राखला गेला. म्हणजे या निकषांवर राज्यांस केंद्राकडून मिळणाऱ्या निधीचा सर्वात मोठा वाटा मिळत गेला. पनगडिया यांचा वित्त आयोग या संदर्भात काही आमूलाग्र बदल करताना दिसतो. या आयोगाने लोकसंख्येस १७.५ टक्के इतका वाटा दिला असला तरी दरडोई सकल राज्य उत्पादनासाठी केंद्राकडून मिळणाऱ्या मदतीत अडीच टक्क्यांची कपात करून तो वाटा ४२.५ टक्क्यांवर आणला आहे. तथापि या आयोगाकडून खरी सुधारणा प्रस्तावित आहे ती राज्याच्या आर्थिक प्रगतीबाबत. एखाद्या राज्याचा देशाच्या आर्थिक प्रगतीतील वाटा हा एक नवा घटक या वित्त आयोगाने सुचवलेला असून त्यामुळे राज्यांस आर्थिक सुधारणा, प्रगती यासाठी वेगळे उत्तेजन मिळेल. याचा थेट परिणाम अर्थातच महाराष्ट्र, तमिळनाडू, कर्नाटक, गुजरात अशा प्रगतिशील राज्यांस केंद्राकडून अधिक निधी मिळण्यात होईल. ही बाब महत्त्वाची अशासाठी की आतापर्यंत राज्यांस मागासलेपण उत्तेजित करत असे. एखादा प्रांत जितका मागास, तितकी त्यास केंद्राकडून मिळणारी मदत अधिक असा हा साधा हिशेब. त्यामुळे आपापले मागासलेपण जोपासण्यात आणि मिरवण्यात राज्यांस धन्यता वाटत असे. या १६व्या वित्त आयोगाच्या शिफारशींमुळे यात बदल होईल. देशाच्या आर्थिक प्रगतीत राज्याचा जितका वाटा अधिक तितका त्यास केंद्राकडून मिळणारा वाटा अधिक. पनगडिया यांचा वित्त आयोग यासाठी तूर्त १० टक्क्यांची मर्यादा निश्चित करतो. ही महत्त्वाची सुधारणावगळता केंद्राकडून राज्यांत विभागल्या जाणाऱ्या महसुलाच्या प्रमाणात मात्र पनगडिया यांनी वाढ सुचवलेली नाही. सद्य:स्थितीत केंद्राच्या तिजोरीत जमा होणाऱ्या एकूण महसुलातील ४१ टक्के राज्यांसाठी राखीव असतो.

# जिल्हा पाणी व स्वच्छता मिशनमधील कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद आंदोलन

## • धुळे जिल्हा परिषदेच्या कर्मचाऱ्यांचा सक्रिय सहभाग

प्रतिनिधी । धुळे

**स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा–२ व जलजीवन मिशन अंतर्गत जिल्हा परिषद स्तरावर कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ऑक्टोबर २०२५ ते जानेवारी २०२६ या कालावधीतील चार महिन्यांचे मानधन अद्याप प्रलंबित आहे. या गंभीर अन्यायाविरोधात सर्व जिल्हा परिषदांतील कर्मचाऱ्यांतर्फे ४ फेब्रुवारीपासून राज्यभर बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात आले आहे.**




या आंदोलनात धुळे जिल्हा परिषदेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांनीही मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला आहे. शासनाच्या दुर्लक्षाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीज शेख यांना याबाबत निवेदन देण्यात आले. तसेच आज जिल्हा परिषद कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. अनेक वर्षांपासून अल्प मानधनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांच्या उपजीविकेवर, मुलांच्या शिक्षणावर व आरोग्यावर या विलंबाचा गंभीर परिणाम होत आहे. मानसिक तणाव वाढत असतानाही हे कर्मचारी आजपर्यंत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन जिल्हा धुळे ग्रामपंचायत स्तरावर प्रत्यक्ष अंमलबजावणी, क्षेत्रीय तपासणी, लाभार्थी समन्वय, ऑनलाइन नोंदी व अहवाल सादरीकरणाची कामे निष्ठेने पार पाडत होते. महाराष्ट्र राज्य पाणी व स्वच्छता शासकीय कंत्राटी कर्मचारी कृती समितीच्या वतीने निवेदन दिले आहे. मार्च २०२६ पर्यंत नियमित मासिक मानधन वितरणाबाबत स्पष्ट लेखी आदेश काढावेत, एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ या कालावधीसाठी २०२६–२७ अंतर्गत मानधन वितरणाची हमी द्यावी, सर्व कंत्राटी कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधा व सामाजिक सुरक्षा लागू करावी, दीर्घकाळ सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण व सेवा सुरक्षा सुनिश्चित करावी, या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.

## हत्तीरोग सार्वत्रिक औषधोपचार मोहीम

### • १० ते २३ फेब्रुवारीदरम्यान आयोजन : डॉ. संजीव वळवी

प्रतिनिधी । नंदुरबार

**राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत नवापूर तालुक्यातील हत्तीरोग समस्येचे निर्मूलन करण्यासाठी आरोग्य विभागाच्या वतीने सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबविण्यात येणार आहे. ही मोहीम १० ते २३ फेब्रुवारी या कालावधीत संपूर्ण तालुक्यात राबविली जाणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजीव वळवी यांनी दिली.**

या मोहिमेदरम्यान आरोग्य कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका घरोघरी जाऊन पात्र लाभार्थ्यांना डी.ई.सी. आणि अल्बेन्डाझॉल या गोळ्यांची एक मात्रा स्वतःच्या देखरेखीखाली खाऊ घालणार आहेत. हत्तीरोग हा वुचेरेरीया घेतल्यामुळे बॅनक्रॉफटी या जंतूंमुळे होतो आणि त्याचा प्रसार क्युलेक्स डासांमार्फत होतो.

रक्तदाब, मधुमेह किंवा इतर सामान्य आजार असलेल्या रुग्णांनी देखील या गोळ्यांचे सेवन करणे आवश्यक आहे.

नागरिकांनी या गोळया उपाशीपोटी घेऊ नयेत. प्रत्येक व्यक्तीने आहे. आरोग्य कर्मचाऱ्यासमोरच गोळ्या खाणे बंधनकारक आहे. औषध सेवनानंतर ताप किंवा मळमळ यांसारखा त्रास जाणवल्यास घाबरून जाऊ नये. शरीरातील हत्तीरोगाचे जंतू मरत असल्यामुळे असा त्रास होऊ शकतो. आवश्यक असल्यास जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार घ्यावेत.

आरोग्य विभागातर्फे या मोहिमेसाठी शाळांमध्ये जनजागृती, शहरात होर्डिंग्ज, बॅनर्स आणि घंटागाडीद्वारे प्रचार करण्यात येत आहे. या मोहिमेत नवापूर तालुक्यातील प्रत्येक पात्र नागरिकाने सहभागी होऊन हत्तीरोग दुरीकरणासाठी सहकार्य करावे, असेही आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. वळवी यांनी केले आहे.

## नंदुरबारात पावणे दोन टन हाडे जप्त; गुन्हा दाखल

प्रतिनिधी । नंदुरबार

**शहरातील बिफ मार्केट परिसरात विनापरवाना बेकायदा हाडे बाळगल्याप्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत ४३ हजार रुपये किमतीचे १ हजार ७२० किलो वजनाचे लहान, मोठी हाडे जप्त करण्यात आले आहेत. वाहनासह २ लाख ४३ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, रोशन शेख मेहबूब कुरेशी (रा. कुरेशी मोहल्ला, नंदुरबार) याने विनापरवाना बेकायदा लहान, मोठी हाडांची साठवणूक केली होती. त्यामुळे परिसरात दुर्गंधीयुक्त वास येत आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरून वातावरण दूषित झाले होते.

लोकांच्या जीवितास धोका निर्माण करुन आयसर कंपनीच्या टेम्पोमध्ये नमुद वर्णनाचा व किंमतीच्या हाडांनी भरलेल्या गोण्या गाडीत भरताना मिळून आला. त्याच्याकडे ४३ हजार रुपये किमतीचे १ हजार ७२० कि.ग्रॅ. वजनाची लहान, मोठी हाडे मिळून आली. २ लाख रुपये किंमतीची आयसर टेम्पो असा एकूण २ लाख ४३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास हवालदार निलेश वसावे करीत आहेत.

## मुक्या वानराचा दशक्रियाविधीचा बेत

### भाईकरांच्या अनोखे कार्याची परिसरात रंगली चर्चा

प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील भारडू गावात चक्क वानराच्या दशक्रियाविधीचा कार्यक्रम होणार असून उत्तर कार्य करण्याचा बेतही नागरिकांनी आखला आहे. खरोखर या प्रकाराने प्राणी प्रेम उफाळून आले आहे. एरवी मानवालाच माणूस म्हणून न पाहण्याचा घृणास्पद प्रकार वाढीस लागला असून माणसांमध्ये माणुसकीचा अंत पाहायला मिळत आहे. मात्र, या गावात चक्क मुक्या प्राण्याचाही अंत्यविधी करून दशक्रियाविधी व उत्तर कार्याचे महान कार्य हाती घेतल्याने संपूर्ण परिसरात या गावाच्या नावाची चर्चा रंगली आहे.**



गेल्या काही दिवसांपूर्वी भारडू गावात माणुसकीचं हृदयस्पर्शी दुर्मीळ दर्शन पाहावयास मिळाले आहे की, तीन वर्षांपासून गावात वास्तव्यास असलेल्या एका माकडाचा मृत्यू झाल्यानंतर गावकऱ्यांनी त्याला कुटुंबातील सदस्याप्रमाणे सन्मानाने अखेरचा निरोप दिला. सदर माकड गेली तीन वर्षे गावात मुक्तपणे वावरत होते. लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांशी त्याची एक आपुलकी निर्माण झाली होती. गावातील दैनंदिन जीवनाचा तो जणू अविभाज्य घटक बनला होता. त्यामुळे त्याच्या निधनाची बातमी समजताच गावकऱ्यांनी एकत्र येत त्या माकडाची विधीवत अंत्ययात्रा काढून पारंपरिक पद्धतीने दफन विधी केला. आता त्याचा दशक्रियाविधी व उत्तरकार्य करण्याचा बेत ठरविला असल्याने गावकऱ्यांच्या या कार्याचा गवगवा होतं आहे.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी ई–केवायसी पूर्ण करावी

प्रतिनिधी । नंदुरबार

**तालुक्यात ऑक्टोबर २०२५ मधील पीक नुकसान भरपाईच्या रकमेचे वितरण प्रशासकीय स्तरावर सुरू झाले आहे. या प्रक्रियेअंतर्गत, लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा होण्यासाठी ई–केवायसी आणि पोर्टलवरील माहिती भरण्यासाठी दि. २८ फेब्रुवारी अंतिम तारीख आहे. त्यानंतर सर्व रक्कम शासनाकडे व्यपगत होईल व शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार नाही, अशी माहिती नंदुरबार तहसिलदार प्रदीप पवार यांनी दिली आहे. एखाद्या शेतकऱ्याने वेळेत माहिती सादर केली नाही किंवा ई–केवायसी पूर्ण केली नाही आणि ते लाभापासून वंचित राहिले, तर त्यास सर्वस्वी संबंधित शेतकरी जबाबदार राहतील, असेही तहसिलदार पवार यांनी सांगितले.**



## पान १ वरुन

**अमेरिका–इराण आमनेसामने......**

चर्चा करणार नाही. अमेरिकेला चर्चेची व्याप्ती अधिक व्यापक हवी आहे.अरब आणि मुस्लिम देशांनी व्हाईट हाऊसला चर्चा सोडू नये असे आवाहन केले. यानंतर, दोन्ही बाजूंनी वाटाघाटीच्या टेबलावर परत येण्यास सहमती दर्शविली. केवळ अणु मुद्द्यांवरच चर्चा – इराणचा असा दावा आहे की त्याचा अणुकार्यक्रम लष्करी उद्देशांसाठी नाही. तो स्वतःच्या देशात युरेनियम समृद्ध करण्याचा अधिकार राखू इच्छितो आणि युरेनियम निर्यात करण्यास नकार देतो. रशियाने म्हटले आहे की युरेनियम साठवण्याचा त्यांचा प्रस्ताव कायम आहे.

**जळगावहून इंदूरसाठी......**

नवीन फ्रान्समधून १० फेब्रुवारीपर्यंत येणार होते. ते आता २० ते २५ तारखेच्या पुढे भारतात दाखल होणार आहेत. जळगाव ते इंदूर शहराचे अंतर सुमारे २७५ किलोमीटर आहे. त्यासाठी रेल्वेने भोपाळमार्गे गेल्यास आठ ते १० तास, बसने ७ ते ८ तास तर कार किंवा टॅक्सीने ५ ते ६ तासांचा अवधी लागतो. त्या तुलनेत विमानाने अवघ्या सव्वा ते दीड तासात जळगावहून इंदूरला पोहचता येईल. ही सेवा व्यावसायिक झाल्यास किमान २५०० रुपयांवर एका सीटचे तिकीट असेल.

**मंत्री नसतो तर खुटा......**

माझ्याकडे असा रस्ता असेल, तर संबंधितांना मारेन, मग माझ्यावर केस झाली तरी परवा नाही, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

पुढे बोलताना गुलाबराव पाटील यांनी भाजपवरही निशाणा साधला. शिवसेनेत कार्यकर्ते तयार होतात. ते कार्यकर्ते तयार झाले की भाजप आणि काँग्रेससारखे पक्ष त्यांना घेऊन जातात. आम्ही मुले जन्माला घालायची आणि मुले गुबगुबीत झाली की भाजपने मांडीवर बसवून घ्यायची, असा टोला त्यांनी भाजपला लगावला.

**जि.प. व पंचायत समिती......**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर पुणे जिल्ह्यात एकही मोठी जाहीर सभा किंवा भव्य प्रचार सभा आयोजित करण्यात आलेली नाही. या निवडणुकीत प्रतिस्पर्धी असणाऱ्या भाजप, शिवसेने सुद्धा कुठल्याही मोठ्या नेत्यांच्या जाहीर सभा आयोजित केल्या नाहीत. केवळ काँग्रेस पक्षाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या काही मोजक्याच सभा पार पडल्या. घरोघरी जावून प्रचार करण्याला वेग – जाहीर प्रचार बंद झाल्यानंतरही उमेदवारांना घरोघरी जाऊन वैयक्तिक भेटी घेऊन प्रचार करण्यास मुभा असल्याने पुढील दोन दिवस डोअर–टू–डोअर प्रचाराला वेग येण्याची शक्यता आहे. मतदान शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस यंत्रणा आणि निवडणूक यंत्रणा सज्ज असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

**पहिली सरकारी कॅब......**

होतील. चालकांना फक्त किमान सदस्यता शुल्क भरावे लागेल. जे ते त्यांच्या सोयीनुसार दररोज, आठवड्याला किंवा मासिक भरू शकतात.'भारत टॅक्सी' हे केवळ एक ॲप नाही तर सामाजिक सुरक्षा ब्लँकेट देखील आहे. प्लॅटफॉर्ममध्ये सामील होणाऱ्या प्रत्येक चालकाला ₹५ लाखांचा वैयक्तिक अपघात विमा आणि ₹५ लाखांचा कुटुंब आरोग्य विमा प्रदान केला जाईल. शिवाय, ते बहु–राज्य सहकारी संस्था कायद्यांतर्गत कार्यरत असल्याने, भविष्यात चालकांना सुलभ हप्त्यांवर कर्ज देखील दिले जाईल. यामुळे चालक स्वतःची वाहने खरेदी करू शकतील आणि स्वावलंबी बनू शकतील, ज्यामुळे रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील.

**राज्यभरातील परिचारिका......**

आरोग्य विभागातील रुग्णालयांत मोठ्या प्रमाणात परिचारिकांची पदे रिक्त असताना, उपलब्ध मनुष्यबळावरच रुग्णसेवेचा भार आहे. अशा परिस्थितीत सीएमईसाठी सुट्टी मिळणे कठीण आहे.

दरम्यान एखाद्या रुग्णालयातील परिचारिका एकत्रित सीएमईला गेल्यास रुग्णसेवेवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. परिणामी, क्रेडिट पॉईंट मिळवताना परिचारिकांची अक्षरशः दमछाक होत आहे. या गोंधळातच काही संस्था आणि संघटनांनी 'सीएमई'च्या नावाखाली ५०० ते १,००० रुपयांपर्यंत शुल्क आकारण्यास सुरुवात केल्याने परिचारिकांची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे.

## केबल चोरीमुळे शेतकरी त्रस्त

प्रतिनिधी । नंदुरबार

जिल्ह्यात शेतातील केबल चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. या घटनांमुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. चोरांचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे. सध्या शेतात गहू, हरभरा आदी पिकांना पाणी देणे सुरू आहे. तसेच विद्युतपंप चालवण्यासाठी ठिकठिकाणी केबल अंथरण्यात आल्या आहेत. या केबलची जिल्ह्यातील काही भागात चोरी होत असल्याने शेतकरी त्रस्त झाले आहेत. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. अनेक दिवसांपासून या चोऱ्यांचे प्रमाण वाढतच चालले आहे.

## हिसाळे येथे अजितदादा पवार यांना श्रध्दांजली



प्रतिनिधी । चोपडा

**तालुक्यातील घोडगाव येथून जवळच असलेल्या हिसाळे येथे माजी उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याने उभ्या महाराष्ट्रावर आघात झाला आहे. यावेळी त्यांच्या आठवणी जागृत करून त्यांना सर्वपक्षीय व जातीच्या लोकांकडून भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.**

यावेळी माजी जि. प. सदस्या बेबीबाई पावरा, हिरालाल परदेशी राज्य किसानसभा अध्यक्ष, माजी पं. स. उपसभापती संजय संतोष पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिरपूर तालुकाध्यक्ष (अजित पवार गट)बाळकृष्ण कौतिक पाटील, रामेश्वर पाटील सरपंच, अर्जुन कोळी भा.क.प.ज्येष्ठ नेते, अभय भदाणे उबाठा ,कांतीलाल पाटील संचालक शि.सा.का. दहिवद, जितेंद्र करंकाळ वि.का. सो. व्हाइस चेअरमन , वसंत कोळी तंटामुक्ती अध्यक्ष हिसाळे ,भूषण भदाणे राष्ट्रवादी युवक काँग्रेस उपाध्यक्ष शिरपूर तालुका, दत्तात्रेय पाटील ग्रा.पं.सदस्य , व विविध संस्थाचे पदाधिकारी व राजकीय सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थ होते. सूत्रसंचालन निंबा शिंपी यांनी केले.

# हिंगणा–वैजनाथ येथील नवनाथ महाराजांच्या मूर्तीची तोडफोडप्रकरणी चौकशी करा

## • आमदार, प्रांताधिकारी, तहसीलदारांना नाथजोगी समाजातर्फे निवेदन

प्रतिनिधी । मुक्ताईनगर

**नाथ संप्रदायाचे आराध्य दैवत तथा हिंदू धर्मीयांचे श्रद्धास्थान मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, कानिफनाथ आदी नवनाथ महाराज यांच्या मूर्तीचे हिंगणा–वैजनाथ तालुका शेगाव जि. बुलढाणा येथे अज्ञात समाजकंटक तथा माथेफिरूने मूर्तीची विटंबना करून तोडफोड केल्याची संतापजनक घटना घडली आहे. या प्रकरणी येथील नाथजोगी समाजातर्फे दि. २ रोजी आमदार चंद्रकांत पाटील, प्रांताधिकारी जितेंद्र पाटील, तहसीलदार गिरीश वखारे यांना लेखी निवेदन देऊन गुन्हेगारावर कडक कारवाईची मागणी करण्यात आली.**



या प्रसंगी मुक्ताईनगरचे नवनाथ जोगी समाज मंडळ अध्यक्ष मोतीलाल जोगी म्हणाले की, हिंगणा–वैजनाथ येथील नवनाथ महाराजांच्या मूर्तीची तोडफोड झाल्याने आम्हा नाथजोगी समाजातील सर्वांना खूप दुःख झाले आहे. समस्त हिंदूधर्मीय, वारकऱ्यांचे नवनाथ महाराज हे श्रद्धास्थान, प्रेरणास्थान आहे. त्या अज्ञात समाजकंटक व माथेफिरुला त्वरित अटक करून त्याचेवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी त्यांनी केली. याप्रसंगी रमेशनाथ जोगी, दत्तात्रय जोगी, किशोर जोगी, संदीप जोगी, सचिन जोगी, नामदेव जोगी, सुरेश जोगी, अनिल जोगी, दीपक जोगी, कमलेश जोगी, आकाश जोगी आदी समाज बांधव उपस्थित होते. दरम्यान, नवनाथ महाराज मूर्तीची विटंबना व तोडफोडप्रकरणी नाथजोगी समाजाने दिलेल्या निवेदनानुसार आपण जिल्हा पोलीस अधीक्षक जळगाव यांच्याशी चर्चा करून त्यांच्या स्तरावरून या प्रकरणाचा तपास लावण्याचे सांगणार आहे, असे आश्वासन आमदार चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिले. आपल्या भावना शासनस्तरावर कळवू,असे प्रांताधिकारी जितेंद्र पाटील यांनी सांगितले. नाथजोगी समाजाने नवनाथ महाराज मूर्ती विटंबनाप्रकरणी दिलेल्या निवेदनानुसार त्यांच्या भावना आपण शासन स्तरावर कळवू आणि गुन्हेगारावर कठोर कारवाई कशी होईल यासंबंधी प्रयत्न करू, असे प्रांताधिकारी जितेंद्र पाटील यांनी आश्वासन दिले. हिंगणा–वैजनाथ येथील नवनाथ महाराज मूर्ती तोडफोड प्रकरणी खामगाव,शेगाव येथील नाथजोगी समाजाचे शिष्टमंडळ मला भेटलेले आहे. अज्ञात समाजकंटकावर गुन्हा दाखल केलेला आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✲ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✲ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

## थोडक्यात

### केळी दिवस – शिवार फेरी कार्यक्रम उत्साहात

**जळगाव ।** महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी अंतर्गत केळी संशोधन केंद्र, जळगाव येथे फुले कृषी महोत्सव– २०२६ अंतर्गत केळी दिवस व शिवार फेरी कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे उद्घाटन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्वे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमात डॉ. उल्हास सुर्वे, डॉ. सुनील कदम, डॉ. विक्रम कड, डॉ.के.बी. पाटील, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. अरुण भोसले यांनी केले. कार्यक्रमास डॉ. गोरक्ष ससाणे, डॉ. बी. एम. इल्ले, डॉ. यु. बी. हुले, डॉ. संदीप पाटील, डॉ. दिपक दहाट, डॉ. हेमंत बाहेती, डॉ. योगेश्वर पाटील तसेच केळी शेतकरी शास्त्रज्ञ मंचचे अध्यक्ष संदिप पाटील व उपाध्यक्ष विनोद बोरसे यांच्यासह राज्यभरातून सुमारे ४०० केळी उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

### सॅटॅलाइट लॉन्चड बाय इस्रो पोस्टर प्रदर्शनास प्रतिसाद

**जळगाव ।** सॅटॅलाइट लॉन्चड बाय इस्रोचे मोठ्या प्रमाणावर नूतन मराठा महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागातर्फे पोस्टर प्रदर्शन भरवण्यात आले होते. त्यात आदित्य १, चंद्रयान –३, –१, रोहिणी –१, जीसॅट १४ अशा विविध इस्रोने पाठवलेल्या सॅटॅलाइट बद्दल मोठ्या प्रमाणावर पोस्टर प्रदर्शन बनवण्यात आले होते. या पोस्टर प्रदर्शनाचे उद्घाटन सोयो सिस्टिमचे प्रोपोएटर किशोर ढाके यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळेस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.पी.देशमुख, उपप्राचार्य डॉ.के.बी.पाटील, डॉ.माधुरी पाटील, कार्यक्रमाचे आयोजक भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा.आर.बी.देशमुख, परीक्षक म्हणून मराठी विज्ञान परिषदेचे प्रा.दिलीप भारंबे उपस्थित होते. पोस्टर प्रदर्शनात ५५ विद्यार्थी–विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता.

### जिल्हाधिकाऱ्यांची विभागीय रेल्वे व्यवस्थापकांशी चर्चा

**जळगाव ।** जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी भुसावळ विभागीय रेल्वे व्यवस्थापक पुनीत अग्रवाल यांची प्रत्यक्ष भेट घेऊन रेल्वे प्रशासन व जिल्हा प्रशासन यांच्यातील परस्पर समन्वय अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने विविध प्रशासकीय विषयांवर सविस्तर चर्चा केली. या बैठकीत नाशिकत्र्यंबकेश्वर येथील आगामी सिंहस्थ कुंभमेळा अनुषंगाने जिल्हा प्रशासन व रेल्वे प्रशासन यांच्या संयुक्त समन्वयातून करावयाच्या आवश्यक पूर्वतयारी व कार्यवाहीबाबत विचारविनिमय करण्यात आला. कुंभमेळ्याच्या कालावधीत प्रवासी सुविधा, वाहतूक नियोजन व सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजनांवर चर्चा झाली.

# जैन इरिगेशनच्या तिमाही उत्पन्नात १७.४ टक्क्यांची वाढ

## जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष अनिल जैन यांची माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**कृषी क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी जैन इरिगेशन सिस्टिम्स लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२६ तिसऱ्या तिमाहीचे (३२६) आणि नऊ महिन्यांचे (९२६) एकत्रित आर्थिक निकाल जाहीर केले. त्यात कंपनीच्या उत्पन्नात (महसूलात) १७.४ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे.**

कंपनीचे एकत्रित उत्पन्न ₹१,५९८ कोटींवर पोहोचले असून (व्याज, कर, घसारा व अमॉर्टायझेशनपूर्व नफा) ₹१६८ कोटींचा दिसतो आहे. या निकालामुळे बाजारात कंपनीच्या वाढीच्या क्षमतेबाबत गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास अधिक दृढ झाला आहे.



चालू आर्थिक वर्षाच्या या तिमाही कंपनीची चांगली कामगिरी झाली आहे. त्यामुळे ती अत्यंत मजबूत ठरली आहे. सर्व व्यवसाय विभागांमध्ये दुहेरी अंकातील वाढ नोंदविण्यात आली आहे.

अलीकडील जीएसटी दरांतील कपातीमुळे मागणीला चालना मिळाली असून महसूल वाढीस त्याची मदत झालेली आहे.

कार्यक्षम अंमलबजावणी व रोख शिस्तीमुळे कार्यभांडवल चक्रात लक्षणीय सुधारणा झाली असून ऑपरेशन्समधून मजबूत रोख प्रवाह निर्माण झाला आहे.

जैन इरिगेशनचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन पुढे म्हणाले की, आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या नऊ महिन्यांत महसुलात सातत्यपूर्ण वाढ झाली असून मार्जिनमध्येही सुधारणा दिसून येत आहे. किरकोळ व्यवसायावर वाढलेला भर, कार्यक्षमता सुधारणा आणि खर्च नियंत्रण याचे हे सकारात्मक परिणाम आहेत.केंद्रीय अर्थसंकल्पातील पायाभूत सुविधा खर्चामुळे पाइपिंग व्यवसायाला गती मिळेल, तर सौर कृषी पंप व ग्रामीण विकासावर केंद्रित धोरणामुळे मागणी वाढण्याची अपेक्षा आहे.

कंपनीच्या कृषी–प्रक्रिया विभागाने नामांकित आणि अग्रगण्य शीत पेय कंपनी बरोबर नवीन प्रकल्प उभारण्याचे काम सुरू केले असून ४२६ पासून नवीन प्रकल्पातून उत्पन्न योगदान अपेक्षित आहे. तसेच टोमॅटो प्युरी उत्पादनासाठी आंतरराष्ट्रीय कंपनीसोबत संयुक्त उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

जागतिक अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवरही कंपनी शाश्वत वाढ व भागधारकांना मूल्यनिर्मिती करण्यास कटिबद्ध असल्याचा विश्वास कंपनीचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन यांनी व्यक्त केला.

# गर्भवती महिलांनो, आता प्रसूतीच्या वेदना विसरा...!

● डॉ.उल्हास पाटील रूग्णालयात पेनलेस डिलीव्हरी सुविधा उपलब्ध

प्रतिनिधी । जळगाव

**प्रसूतीदरम्यान होणाऱ्या तीव्र वेदनांमुळे अनेक गर्भवती महिलांमध्ये भीतीचे वातावरण असते. मात्र, आता ही भीती दूर करणारी आधुनिक पेनलेस डिलीव्हरी (वेदनारहित प्रसूती) सुविधा जळगाव येथील डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात सुरू करण्यात आली आहे. या सुविधेमुळे महिलांना प्रसूतीदरम्यान होणाऱ्या तीव्र वेदनांपासून मोठा दिलासा मिळणार आहे.**

पेनलेस डिलीव्हरी ही एक आधुनिक आणि सुरक्षित वैद्यकीय पद्धत असून, यामध्ये प्रसूतीच्या वेळी महिलांच्या पाठीमध्ये (स्पाईनमध्ये) विशिष्ट प्रकारचे इंजेक्शन दिले जाते. या इंजेक्शनमुळे प्रसूतीदरम्यान होणाऱ्या असह्य वेदना मोठ्या प्रमाणात कमी होतात किंवा पूर्णपणे थांबतात. विशेष म्हणजे या प्रक्रियेमुळे आई व बाळ दोघांनाही कोणताही धोका होत नाही. डॉ. उल्हास पाटील रूग्णालयात ही सुविधा उपलब्ध असून अत्याधुनिक उपकरणे, अनुभवी भूलतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ आणि प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ यांच्या संयुक्त सहकार्याने उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रसूतीपूर्व तपासणीपासून ते प्रसूतीनंतरच्या काळजीपर्यंत सर्व प्रक्रिया तज्ज्ञ डॉक्टरांच्या निरीक्षणाखाली पार पाडल्या जातात. पेनलेस डिलीव्हरीमुळे महिलांना मानसिक तणाव कमी जाणवतो. वेदना कमी झाल्यामुळे महिलांमध्ये प्रसूतीबाबत सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होतो.

# शहरात ७० किलो गोवंश मांसासह रिक्षाचालक जेरबंद

● एमआयडीसी पोलिसांची कारवाई

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील जळगाव–भुसावळ रोडवर स्वामी नारायण मंदिराजवळ एका रिक्षाचालकामध्ये ७० किलो गोवंश मांस आढळून आले. एमआयडीसी पोलिसांनी मोठी कारवाई करत एका रिक्षाचालकाला ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून मुद्देमाल हस्तगत केला आहे.**




शहरातील दूरदर्शन टॉवर परिसरातील स्वामी नारायण मंदिराजवळून दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.२५ वाजेच्या सुमारास एक संशयास्पद रिक्षा (क्रमांक.१९, ७७४५) जात होती. पोलिसांनी या बजाज रिक्षाची तपासणी केली असता, त्यात गोवंश जनावरांची कत्तल करून विक्रीच्या उद्देशाने नेले जाणारे सुमारे ७० किलो मांस आढळून आले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी शेख जमीर मेहबूब (वय ५४, रा. उस्मानिया पार्क, शिवाजी नगर, जळगाव) याला ताब्यात घेतले आहे.

### यांनी बजावली कामगिरी

या मोहिमेत तपास अधिकारी पोहेकॉं रामदास कुंभार, पोहेकॉं गिरीष पाटील, सफौ.विजयसिंग पाटील, पोना प्रदिप चौधरी, पोकॉं विनोद आस्कर आदींचा समावेश होता. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार रामदास कुंभार करीत आहेत.

याप्रकरणी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनमध्ये त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम कलम ५, ५(क), ९, ९(अ) अन्वये गुन्हा रजिस्टर क्रमांक ०८३/२०२६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. माहेश्वरी रेड्डी, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन गणापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या सूचनेनुसार करण्यात आली.

### अमृत संस्थेमार्फत उद्योजकता विकास प्रशिक्षण

प्रतिनिधी । जळगाव

महाराष्ट्र शासनाच्या अमृत या स्वायत्त संस्थेमार्फत खुल्या वर्गातील आर्थिक दुर्बल घटकातील, कोणताही शासकीय आर्थिक लाभ न मिळालेल्या समाजासाठी उद्योजकता विकास कार्यक्रम आयोजित केला आहे. हा प्रशिक्षण वर्ग ९ फेब्रुवारीपासून शहरात सुरू होणार असून १९ फेब्रुवारीपर्यंत चालणार आहे. १० दिवसांचा हा कार्यक्रम पूर्णतः विनामूल्य आहे.

# विज्ञान प्रदर्शनात पर्यावरण स्नेही प्रकल्पांना विद्यार्थ्यांचे प्राधान्य

प्रतिनिधी । जळगाव

**शालेय जीवनापासून विद्यार्थ्यांची कौशल्य विकसित व्हावी त्यांच्या जाणीवा विकसित व्हाव्यात, या उद्देशाने बहिणाबाई विद्यालयात दोन दिवशीय आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते.**



या प्रदर्शनाच्या उद्घाटनासाठी संस्थाध्यक्ष पांडुरंग काळे, लीलाधर नारखेडे, कार्याध्यक्ष जनार्दन रोटे, समन्वयिका प्रतिभा खडके, मुख्याध्याप डॉ. विलास नारखेडे उपस्थित होते. इयत्ता पाचवी ते दहावीतील विद्यार्थ्यांनी विविध थीम्सवर आधारित संशोधन प्रकल्पात दाखवले. त्यात पर्यावरण संरक्षण, अन्न, पाणी, शुद्धीकरण, रोबोट आदींचा समावेश होता. यात श्रद्धा वडनेरे, रुद्र बारी, प्रेम गोसावी, विघ्नेश लोहार, सुजित चव्हाण, मीनल महाले, गुंजन बाविस्कर यांची उपकरणे लक्षवेधी ठरली. राजेश वाणी, दिनेश चौधरी, संतोष पाटील, अजय कुमार, स्वाती कोल्हे, सीमा चौधरी, डॉ.प्रतिभा राणे, दुर्गादास कोल्हे यांचे मार्गदर्शन लाभले.

# आदिवासी कोळी समाज राज्यस्तरीय वधू–वर परिचय मेळावा

प्रतिनिधी । जळगाव

**राज्यस्तरीय आदिवासी कोळी समाज वधुवर परिचय मेळावा नुकताच संपन्न झाला. या परिचय मेळाव्यात २०० पेक्षा अधिक तरुण– तरुणींनी आपला परिचय दिला. १५ फेब्रुवारीपर्यंत वधू वर परिचय सूची समाज बांधव यांना उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती प्रा. भाऊसाहेब सोनवणे यांनी यावेळी दिली.**




या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी एपीआय भगवान कोळी तर, उद्घाटक म्हणून आमदार राजूमामा भोळे, मंदा सोनावणे, प्रभाकर सोनवणे, दिनेश सोनावणे, ज्ञानेश्वर कोळी, भरत सपकाळे, डॉ.दिवाकर पाटील, फैजपूर नगरपालिका उपनगराध्यक्ष निकिता कोळी, नगरसेवक भाग्यश्री सोनवणे उपस्थित होते. यशस्वीतेसाठी आयोजक नारायण कोळी, रणरागिणी ग्रुपच्या अध्यक्ष स्नेहा सोनावणे, रवी आप्पा कोळी, रोहन सोनवणे, योगेश बाविस्कर, नामदेव कोळी, रामचंद्र सोनवणे, प्रमोदिनी पाटील, सुनीता सपकाळे, दीपाली भाऊसाहेब सोनवणे, कविता सपकाळे, शोभा कोळी, छाया कोळी, बाळासाहेब सैंदाने, लिलाधर सोनवणे यांनी परिश्रम घेतले.

# युटोपीया इंग्लिश मीडियमच्या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांचा कलाविष्कार

● विज्ञान प्रदर्शन, बाल आनंद मेळाव्यालाही उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी । जळगाव

**पिंप्राळा येथील युटोपीया इंग्लिश मीडियम स्कुलच्या वार्षिक स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांच्या कलाविष्काराने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. यावेळी उपस्थितांनी टाळ्या वाजवून चिमुकल्यांच्या कलागुणांना भरभरून प्रतिसाद दिला.**

युटोपीया इंग्लिश मीडियम स्कुलच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त विज्ञान प्रदर्शन व बालआनंद मेळावा भरविण्यात आला होता. यावेळी विज्ञान प्रदर्शनात शाळेच्या ७५ विद्यार्थ्यांनी अतिशय उत्तम पध्दतीने मॉडेल तयार करून सादर केले. तसेच बालआनंद मेळाव्यात १० विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल लावून खरेदी विक्रीचे व्यावहारीक ज्ञान अवगत केले. त्यानंतर शाळेच्या स्नेहसंमेलनाचे आयोजन




करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार राजूमामा भोळे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे नवनिर्वाचित नगरसेवक नरेंद्र पाटील, कविता शिवदे, माधुरी बारी, अतुल बारी, आयडीयल इंग्लिश स्कुलचे प्राचार्य श्रीकांत निकम आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान उमाकांत बुंदेले यांनी भूषवले. स्नेहसंमेलन कार्याक्रमात १०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला असून हिंदी–मराठी गाण्यांवर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले. तसेच काही विद्यार्थ्यांनी तारक मेहता का उलटा चष्मा या मालिकेवर नाट्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वैदेही नाखरे यांनी केले. आभार शाळेच्या प्राचार्या अपर्णा बुंदेले यांनी मानले. यशस्वीतेसाठी शिक्षक कल्याणी बुंदेले, अपेक्षा सरदर, ज्योती दांडगे, मोहिनी चौधरी, प्रियंका पाटील, धनश्री चौधरी, रेखा सुरवाडे, ममता पाटील, अमेय बुंदेले, चंद्रकांत बुंदेले यांनी परिश्रम घेतले.

# कॅन्सर दिनी जनजागृती अभियान

प्रतिनिधी । जळगाव

**अर्पण सेवा ट्रस्ट व पवन चॅरिटेबल ट्रस्ट संस्थेतर्फे कॅन्सर जनजागृती अभियान राबविण्यात येत असून जळगाव जिल्ह्यात कौन्सिलिंग सेंटर उभारण्यात येणार आहे.**

कॅन्सर रुग्णालयामध्ये विविध प्रकारच्या उपाययोजना होणे गरजेचे आहे. याकरिता आरोग्य विभाग, भारत सरकार, महाराष्ट्र सरकार अर्पण ट्रस्टच्या कॅन्सर जनजागृती अभियान लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी संस्था गंभीरपणे पावणे उचलत आहे, असे संस्थेचे डॉ. विलास नारखेडे, रघुनाथ राणे, रवी राठोड, लीलाधर नारखेडे, कैलास भोळे, डॉ. हरीष सोनार, डॉ. प्रसन्ना बोरोले, डॉ.अमित भंगाळे, डॉ. विश्वेश खडके, डॉ. पंकज पाटील, डॉ. उमेश चौधरी, पवन नारखेडे यांनी सांगितले. या अभियानाची गरज ग्रामीण भागासाठी आवश्यक आहे. धावपळीच्या जीवनात लोकांची चुकीची जीवनशैली व आरोग्याकडे दुर्लक्ष झाले आहे. त्यांना आरोग्यविषयी माहिती देणे गरजेचे आहे.

# जळगावात मुस्लिम तरुणांचा मनसेत प्रवेश

प्रतिनिधी । जळगाव

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या नेतृत्वावर आणि राजकारणावर विश्वास ठेवून जळगावातील सुप्रीम कॉलनी परिसरातील अनेक मुस्लिम तरुणांनी आज मनसेचा झेंडा हाती घेतला.**

मनसे जिल्हाध्यक्ष ॲड. जमील देशपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी पक्षाची ध्येयधोरणे जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी युसुफ जाकीर खाटीक यांची सुप्रीम कॉलनी परिसर शाखाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

या सोहळयाला मनसे उपशहराध्यक्ष श्रीकृष्ण मेंगडे, ललित शर्मा, राजेंद्र निकम, प्रकाश जोशी, विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष कल्पेश पवार, उमेश आठरे यांसह पक्षाचे अन्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. पक्षात प्रवेश करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने अशपाक शहा, बादशहा महमूद शहा, आली खाटीक, साहिल शेख, इमरान शहा, जुबेर खाटीक, शोएब खाटीक यांच्यासह अनेक तरुणांचा समावेश आहे. जिल्हाध्यक्षांनी या सर्व नवनियुक्त कार्यकर्त्यांचे स्वागत केले.

# म्हसावद येथे भव्य अमरनाथ गुहा दर्शन

## १२ ज्योतिर्लिंग दर्शन, गीता प्रदर्शनी; सांस्कृतिक जागृतीचा नवा प्रवाह

प्रतिनिधी । जळगाव

### ब्रह्माकुमारी संस्थेचा ऐतिहासिक आध्यात्मिक महोत्सव

**तालुक्यातील म्हसावद येथे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या वतीने म्हसावद पुण्यनगरीत ९० व्या त्रिमूर्ती शिव जयंतीनिमित्त प्रथमच ऐतिहासिक स्वरूपाचा आध्यात्मिक महोत्सव आयोजित करण्यात आला आहे.**

या महोत्सवांतर्गत अमरनाथ गुहा दर्शन, १२ ज्योतिर्लिंग दर्शन तसेच श्रीमद्भगवद्गीता प्रदर्शनीचे भव्य आयोजन मंगळवार, दि. १० फेब्रुवारी रोजी करण्यात येणार आहे. शिवरात्री महोत्सव कार्यक्रम मंगळवार दि. १० ते १५ फेब्रुवारी पर्यंत




चालणार आहे. या कार्यक्रमामुळे म्हसावद परिसरात आध्यात्मिक चेतना, भक्तीभाव आणि सांस्कृतिक जागृतीचा नवा प्रवाह निर्माण होणार असून भाविकांसाठी ही एक अविस्मरणीय आध्यात्मिक अनुभूती ठरणार आहे.

या कार्यक्रमाचा भव्य उद्घाटन सोहळा सकाळी १० वाजता राजयोगीनी ब्रह्माकुमारी मिनाक्षीदीदी व सर्व शिवशक्ती समर्पित राजयोग शिक्षका बहिणींच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. उद्घाटनावेळी आध्यात्मिक संगीत व दीपप्रज्वलनाच्या वातावरणात अमरनाथ गुहा व १२ ज्योतिर्लिंगांच्या दिव्य प्रतिकृतींचे दर्शन भाविकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. उद्घाटनापूर्वी सकाळी ९.३० वाजता इंग्लिश मीडियमच्या लहानग्या बालकांच्या लेझीम पथकाद्वारे चौकापासून ब्रह्माकुमारी सेवाकेंद्रापर्यंत भव्य स्वागत मिरवणूक काढण्यात येणार आहे. पारंपरिक लेझीम, घोषवाक्ये आणि भक्तिगीतांच्या माध्यमातून भगवान शिवाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचविण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांची प्रेरक उपस्थिती लाभणार आहे. याशिवाय म्हसावाद परिसरातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, भक्तगण व ब्रह्माकुमारी संस्थेचे सेवाभावी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या भव्य आध्यात्मिक महोत्सवात म्हसावद व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन ब्रह्माकुमारी संस्थेच्यावतीने करण्यात आले आहे. हा कार्यक्रम केवळ धार्मिक उत्सव नसून समाजात मूल्यनिष्ठ जीवन, शांती, सद्भावना व आध्यात्मिक जागृती निर्माण करणारा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे म्हसावद उपसेवाकेंद्र संचालिका ब्र.कु. योजना बहन आणि शेंदूर्णी येथील संचालिका ब्रह्माकुमारी दिपा बहन यांनी सांगितले.

